# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८—१९/26
दिनांक —०८ ऑक्टोबर, २०१८

परिपत्रक :—

विषय — सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणा—या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना,पुस्तक पेढी योजना व विद्यावेतन योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीबाबत.

संदर्भ — क्र. सकआ/शिक्षण/स्वाधार योजना/प्रचार प्रसिध्दी/२०१८—१९/३३०२ दिनांक : १४/०९/२०१८.

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये/संस्था तसेच संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र यांना कळविण्यात येते की, अनुसूचित जाती नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना सध्या राज्यातील कार्यरत सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहामधील मर्यादित जागे अभावी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे तसेच केवळ आर्थिक कारणामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीच्या मुख्य प्रवाहामध्ये टिकून राहण्यासाठी त्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करण्यासाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना संदर्भिय शासननिर्णयान्वये सन २०१६—१७ पासून सुरू केलेली आहे.

त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागांतर्गत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकरीता ग्रंथपेढया (पुस्तक पेढी योजना) कार्यरत आहे. तसेच व्यवसायिक पाठयक्रमात शिकणा—या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना कार्यरत आहे.

वरील योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), राणीची बाग, पुणे या संस्थेमार्फत समतादूत यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. महाविद्यालयात व मुंबई विद्यापीठातील विभागात वरील योजनांचा प्रचार—प्रसार, समतादूत करणार आहे. त्यासाठी विद्यापीठा अंतर्गत सर्व संबंधित महाविद्यालयांना/विभागांना समतादूत भेट देणार आहे. यांना सहकार्य करणेबाबत आपल्या स्तरावर सूचना देण्यात याव्यात.

परिपत्रकासोबत उपरोक्त संदर्भांकित पत्र विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार कार्यवाही करावी.

26.10.18

(प्रा. एस.जी. भिरूड)
कुलसचिव (प्र)

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये/संस्था तसेच संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र.

महाराष्ट्र शासन

आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे
दूरध्वनी क्र.२०-२६१२७५६९ फॅक्स क्र.०२०-२६१२६६९८ ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/स्वाधार योजना/प्रचार प्रसिध्दी/२०१८-१९/3302 दिनांक: ११/०९/२०१८.

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई ४०००३२

विषय: सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, पुस्तक पेढी योजना व विद्यावेतन योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीबाबत..

अनुसूचित जाती नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना सध्या राज्यातील कार्यरत सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहामधील मर्यादित जागे अभावी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे तसेच केवळ आर्थिक कारणामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीच्या मुख्य प्रवाहामध्ये टिकून राहण्यासाठी त्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करण्यासाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना संदर्भिय शासननिर्णयान्वये सन २०१६-१७ पासून सुरु केलेली आहे.

त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागांतर्गत वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांकरीता ग्रंथपेढ्या (पुस्तक पेढी योजना) कार्यरत आहे. तसेच व्यवसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना कार्यरत आहे.

वरील योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), राणीचा बाग, पुणे या संस्थेमार्फत समतादूत यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर समतादूत यांना आपल्या विद्यापीठाअंतर्गत कार्यरत महाविद्यालयामध्ये वरील योजनांच्या प्रचार, प्रसार व प्रसिध्दी करणार आहेत व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या योजनांची माहिती देणार आहेत. त्यासाठी आपल्या विद्यापीठाअतर्गत सर्व संबंधीत महाविद्यालयांना समतादूत यांना सहकार्य करणेबाबत आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. ही विनंती.

(माधव वैद्य)
सहआयुक्त (शिक्षण)
समाज कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे

प्रत:
१) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे.
२) मुख्य प्रकल्प संचालक (समतादूत विभाग), डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे. (poaactbarti@gmail.com)